## **मॉंटे क्रिस्टोचा सरदार (Count of Monte Cristo): अलेक्झांडर ड्युमा**
मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**<u>प्रास्ताविकः</u>**

ही एक फ्रेंच कादंबरी आहे. नेपोलियनच्या पहिल्या पराभवानंतरचा काळ. त्याला सेंट एल्बा या बेटावर इंग्लिश लोकांनी बंदिवान करून ठेवलेले असते. त्याचे पाठिराखे फ्रान्समध्ये त्याला आणण्याचा निकराने प्रयत्न करत असतात, तर फ्रान्सचे काळजीवाहू सरकार हे प्रयत्न हाणून पाडण्याचा आटोकाट प्रयत्न करत असते. अशा काळात घडलेली ही गोष्ट.

सर्वसामान्य माणसाला अन्यायाची चीड असते, पण दुर्बलतेमुळे तो प्रतिकार करू शकत नाही. एखाद्या कथेत अन्यायाचा सूड घेणारा नायक दाखवल्यास तो वाचकांचा लाडका होतो. अशा कथा काल्पनिक असल्या तरी खूप लोकप्रिय होतात. Count of Monte Cristo ची कथा अशाच एका मध्यमवर्गीय युवकाची सूडकथा आहे. एका सत्यकथेवर आधारलेली ही कथा फ्रान्समध्ये अजूनही अमाप लोकप्रिय आहे. Three musketeers (तीन शिलेदार) या गाजलेल्या कादंबरीचा व पटकथेचा लेखक ड्यूमा हा फ्रान्सचा एक लोकप्रिय साहित्यिक आहे. 'अलका' थिएटरला आलेला Three musketeers हा सिनेमा अनेकांना आठवत असेल.

**<u>प्रमुख पात्रेः</u>**

| | |
|---|---|
| एडमंड दान्ते | एक फ्रेंच तरूण दर्यावर्दी; नंतर मॉंटे क्रिस्टो बेटाचा अधिपती/संस्थानिक |
| मर्सिडिज | दान्तेची प्रेयसी, वाग्दत्त वधू |
| मॉरेल | व्यापारी व जहाज मालक; दान्तेचा हितचिन्तक;<br>दान्तेच्या गैरहजेरीत त्याच्या वडिलांना खूप आर्थिक मदत करतो. |
| डॅंग्लर | दान्तेच्या जहाजावरील वरिष्ठ अधिकारी, दान्तेचा मत्सरी प्रतिस्पर्धी;<br>दान्तेचा शत्रू क्र. १. |
| गॅस्पर कॅडॅरूज | दान्तेचा शेजारी, दान्तेच्या बंदिवासाला अप्रत्यक्ष मदत, दान्तेचा शत्रू क्र. २. |
| मॉंडेगो | मर्सिडीजला फसवून तिच्याशी विवाह करतो; दान्तेच्या विरूद्ध सरकारी<br>अधिकाऱ्यांना पत्र लिहून त्याच्या बंदीवासास कारणीभूत होतो. दान्तेचा शत्रू क्र. ३. |
| व्हिलीफर्ट | वरिष्ठ पोलिस अधिकारी; त्याचे पूर्वी नेपोलियन बोनापार्टशी संबंध असतात;<br>आताच्या सरकारला ते समजू नये म्हणून तो स्वतःच्या स्वार्थासाठी दान्तेला<br>राजकीय गुन्ह्यात अडकवून त्याला अन्यायाने प्रदीर्घ तुरुंगात डांबतो.<br>दान्तेचा आणखी एक शत्रू; शत्रू क्र. ४. |
| ॲबे फराया | दान्तेचा तुरुंगातील मित्र;<br>मॉन्टे क्रिस्टो बेटावरील छुप्या खजिन्याची सर्व माहिती दान्तेला देतो. |
| मॅक्झिमिलियन, आल्बर्ट, बर्टशिओ, ऍसंटो ... | दान्तेच्या नंतरच्या आयुष्यातील सहकारी, मदतनीस. |

**कथानक:**

१८१५. नेपोलियन बोनापार्टच्या पहिल्या पराभवानंतरचा काळ; त्याला सेंट एल्बा या बेटावर बंदिस्त करून ठेवलेले असते. त्याचे मित्र त्याने परत फ्रान्समध्ये यावे म्हणून प्रयत्न करत असतात, तर सध्याचे स्वार्थी मंत्रिमंडळ सरकार हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी जागरूक असतात. काही घरभेदे या सरकारला मदत करून स्वत:चा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत असतात. असा हा थोडा गोंधळाचा काळ.

या वेळी एडमंड दान्ते आपल्या जहाजातून मार्सेलिस बंदरात उतरतो. त्यावेळी त्याला कल्पनाही नसते की त्याचे शत्रू त्याची वाटच पहात असतात. त्याचा दुय्यम अधिकारी डँग्लर त्याचा काटा काढून स्वतः कप्तान होण्यासाठी उत्सुक असतो. त्याच्या नियोजित पत्नीशी विवाह करायला उत्सुक असलेला त्याचा दुसरा वैरी फर्नांड मॉंडेगो संधीची वाट पहात असतो. हे दोघेजण कपट कारस्थान करून आपला डाव साधतात.  दान्तेच्या खिशात एक खोटे पत्र टाकून तो नेपोलियनचा हेर आहे असा पुरावा डँग्लर तयार करतो व त्याचवेळी अशा सूचनेचे पत्र मॉंडेगो पोलीस अधिकाऱ्याकडे - व्हिलिफर्टकडे - पाठवतो. व्हिलिफर्ट हा स्वार्थी पोलिस अधिकारी त्या पत्राच्या आधारे दान्ते आपल्या प्रेयसीशी लग्न करण्याच्या तयारीत असतानाच त्याला पकडतो व त्याला नेपोलियनचा हेर ठरवून चौकशी न करताच  एका भयाण अंधारकोठडीत डांबून टाकतो. दान्तेचा शेजारी कॅडॅरूज याला हा कट माहिती असतो, पण दान्तेचे घर बळकावण्याच्या मोहापायी तो कोणालाच याची दाद लागू देत नाही. चार स्वार्थी शत्रू एका निरपराध युवकाला काळ्या कोठडीत बंदिवान करतात व त्याचे जीवन बरबाद करतात.

दान्तेच्या वडिलांना, प्रेयसीला या कारस्थानाचा काहीही पत्ता लागत नाही. पुष्कळ तपास करूनही दान्तेचा काही पत्ता लागत नाही. दान्ते मरण पावला असे खोटेच सांगून फर्नांड मॉंडेगो मर्सिडिजशी लग्न करतो. दान्तेचे वडिल निष्कांचन अवस्थेत मुलाची वाट पहात असतानाच उपासमारीने मृत्यू पावतात. त्यांना वाचवण्याचे मॉरेलचे सर्व प्रयत्न फोल ठरतात.

१० वर्षे लोटतात. सुटकेची सर्व आशा मावळलेला हताश दान्ते एका रात्री शेजारच्या खोलीतून येणाऱ्या ठोकाठोकीने जागा होतो. दुसऱ्या रात्री त्याच्या खोलीची जमीन दुभंगते व त्यातून एक डोके वर येते. तो असतो ॲबे फराया, एक ज्यू धर्मोपदेशक, त्याच्यासारखाच निष्पाप कैदी. त्या गुप्त बोळकंडीतून तो रोज दान्तेला भेटतो; त्यांची मैत्री जमते. ॲबे खूप हुशार असतो. तो दान्तेला इतिहास, गणित, व भाषा शिकवतो. आणि ... एके दिवशी मॉन्टे क्रिस्टो नावाच्या बेटावर गुप्त ठिकाणी असलेल्या प्रचंड खजिन्याची सर्व माहिती देतो.

दान्तेच्या शिक्षेची १४ वर्षे पूर्ण होतात, पण त्याच्या सुटकेची काहीच हालचाल होत नाही. आपल्याला मरेपर्यंत इथेच राहावे लागणार याची खात्री पटल्यामुळे दान्ते कमालीचा निराश होतो. कोठडीतील हवामानामुळे ॲबेची तब्येत बिघडते आणि एके दिवशी तो मरण पावतो. पहारेकरी त्याचे प्रेत एका पोत्यात घालून ठेवतात. ते पाहताच दान्तेला आपल्या सुटकेची एक कल्पना सुचते.

तो फरायाचे प्रेत बोळकंडीतून ओढत आणून आपल्या खोलीतील बिछान्यावर आणून ठेवतो व स्वतःला त्या पोत्यात बंद करून घेतो. मध्यरात्री पहारेकरी घाईघाईने येतात; ते पोते खंदकाच्या पाण्यात फेकून देतात. वादळात ते पोते वाऱ्याने समुद्रात येते; दरम्यान दान्ते आतून ते पोते फाडतो व बाहेर येतो. अंधारातून पोहत पोहत तो एका बेटाच्या किनाऱ्याजवळ येतो. चांचे लोकांचे एक जहाज त्या किनाऱ्यावर लागलेले असते. चांचे त्याला बळजबरीने जहाजावर घेतात व काम करायला लावतात. काही महिन्यांनी योगायोगाने त्यांचे जहाज मॉंटे क्रिस्टो या बेटाला लागते व तेथे काही काळ थांबते. पायाला जखम झाल्याचे सोंग करून दान्ते त्या बेटावर थांबतो; चांचे त्याला तिथेच सोडतात व परत घ्यायला येण्याचे आश्वासन देऊन निघून जातात. दान्ते त्या बेटावर एकटाच असतो. ऍबेने सांगितलेल्या खुणांनुसार तो बेटावर फिरतो व एके दिवशी गुहेत दडवून ठेवलेला गुप्त खजिना त्याला सापडतो.

काही दिवसांनी चांचे त्याला घ्यायला येतात; काही थोडी मौल्यवान रत्ने व सोन्याच्या मोहरा घेऊन तो चांच्यांबरोबर मार्सेलिसच्या मुख्य भूमीवर येतो. एक हिरा विकून तो एक जहाज मिळवतो व मॉंटे क्रिस्टोला परत येऊन सर्व खजिना पॅरिसला घेऊन येतो.

त्या अफाट संपत्तीच्या साहाय्याने तो पॅरिसच्या श्रीमंत वस्तीत मोठे घर घेतो. स्वतःला मॉंटे क्रिस्टोचा संस्थानिक (Count of Monte Cristo) असे म्हणवून श्रीमंत सरदारासारखा राहू लागतो. मेजवान्या, घोडागाडी, नोकरचाकर अशा जीवनशैलीमुळे तो लवकरच खूप लोकप्रिय होतो. एका ग्रीसच्या प्रवासात परत येताना हैदी नावाच्या सुंदर तरुण स्त्रीला आपल्याबरोबर घेऊन येतो व तिच्या संगतीत उच्चभ्रू लोकांच्या जीवनात मिसळून जातो. त्याचे मूळ नाव व व्यक्तिमत्व या नवीन वातावरणात पूर्णपणे झाकून जाते.

काही दिवस जातात; त्याच्या वादळी आगमनामुळे डचमळलेले पॅरिसचे जीवन शांत होते व त्याच्याबद्दलची लोकांची उत्सुकता विरून जाते. आणि एके दिवशी दान्ते आपला पूर्वीचा शेजारी गॅस्पर कॅडॅरुज याला धर्मोपदेशकाच्या वेषात भेटतो. पापाची कबुली (confession) या नावाखाली तो त्याच्याकडून आपल्या सर्व शत्रूंची सध्याची माहिती काढतो आणि सुडाची आपली सर्व योजना ठरवतो.

डॅग्लर बँकर झालेला असतो व त्याने खूप संपत्ती मिळवलेली असते. व्हिलीफर्टही खूप मालदार झालेला असतो व नव्या मंत्रिमंडळामध्ये वरच्या हुद्द्यावर असतो. फर्नांडने मर्सिडीजशी लग्न केलेले असते; त्याला मॅक्झिमिलियन नावाचा मुलगा झालेला असतो व तोही संपत्तीत लोळत असतो. दान्तेचा साह्यकर्ता मॉरेल मात्र दिवाळखोरीच्या काठावर असतो. त्याची बरीचशी जहाजे नष्ट झालेली असतात व धंदा पूर्णपणे मोडकळीला आलेला असतो. त्याने दान्तेच्या वडिलांना बरेच पैसे देऊन उपासमारीपासून वाचवण्याचा प्रयत्न केलेला असतो, पण त्याचा तो प्रयत्न विफल झालेला असतो; दान्तेचे वडिल तडफडून मरण पावलेले असतात.

ही सर्व माहिती मिळताच दान्ते - आता आपण त्याला मॉंटे क्रिस्टो म्हणू या - आपली पुढची कृतीयोजना (action plan) निश्चित करतो व कामाला लागतो. ही माहिती दिल्याबद्दल तो गॅस्परला ५० हजार फ्रँक्स किंमतीचा हिरा बहाल करतो.

आधी तो आपल्या हितकर्त्या मित्राला मॉरेलला भरपूर आर्थिक सहाय्य करतो व त्याचा धंदा परत तेजीत आणतो. आश्चर्यचकित झालेल्या मॉरेलला तो एके दिवशी आपली खरी ओळख देतो; दोघे मित्र कडकडून भेटतात.

आपल्या जीवनाचा विध्वंस करणाऱ्या सर्व शत्रूंची माहिती मिळताच क्रिस्टो आपली सूडाची योजना कार्यान्वित करतो. पहिला मोर्चा तो गॅस्परकडे वळवतो. ५० हजार फ्रँक्सच्या भेटीतून त्याने गॅस्परचा विश्वास संपादन केलेला असतो व त्याचा लोभही जागृत केलेला असतो. लोभी पत्नीच्या सल्ल्याने गॅस्पर एक मोठी चोरी करतो व त्या प्रयत्नात एकाचा खून करतो. मॉंटे क्रिस्टोच्या बंगल्यात मोठी चोरी करण्याच्या प्रयत्नात तो त्याच्याच साथीदाराकडून मारला जातो.

बँकर झालेल्या डँग्लरला क्रिस्टो आपले पैसे देऊन धोकादायक (risky) गुंतवणूकीस प्रवृत्त करतो व हळूहळू त्याचा आर्थिक अध:पात घडवून आणतो. डँग्लरच्या एकुलत्या एक मुलीला - यूजिनीला - क्रिस्टो आपल्या नादी लावतो. एके दिवशी क्रिस्टोच्या सूचेनुसार यूजिनी डँग्लरची सर्व संपत्ती व बँकेच्या सर्व ठेवी घेऊन पळून जाते. निष्कांचन झालेला डँग्लर बदनामीच्या भयाने सर्व सोडून देशाबाहेर परागंदा होतो.

फर्नांड मॉंडेगो आरमारी अधिकारी असताना ग्रीसमधल्या राज्यक्रांतीमध्ये त्याने तेथील बादशहा अलि पाशा याचा विश्वासघात करून त्याला लुटलेले असते. डँग्लरला ग्रीसला पाठवून फर्नांडच्या या कृष्णकृत्याची सर्व माहिती क्रिस्टो मिळवतो व फर्नांडच्या थोरल्या मुलाला आल्बर्टला सांगतो. संतापलेला आल्बर्ट क्रिस्टोला द्वंद्वयुद्धाचे आव्हान देतो. त्याची ओळख नसल्यामुळे क्रिस्टो त्याला जीवे मारण्याच्या बेतात असतो, त्या वेळी मर्सिडिज रदबदली करून त्याचे प्राण वाचवते. एका सभेत प्रतिष्ठित लोकांच्या समोर क्रिस्टो फर्नांडची सर्व अपकृत्ये उघडकीस आणतो. सुरवातीस आल्बर्ट व नंतर अलि पाशाची मुलगी असलेली हैदी या सर्व बदनामीला दुजोरा देते. अपमानित फर्नांड स्वत:वर गोळी झाडून घेऊन आत्महत्या करतो. मर्सिडिज व आल्बर्ट पॅरिस सोडून निघून जातात.

व्हिलीफर्ट्च्या पत्नीला मॉंटे क्रिस्टो दागिन्यांचे आमिष दाखवून आपल्याकडे आकर्षित करतो. त्याच्या मोहात अडकलेली मॅडम व्हिलिफर्ट त्याच्या धूर्तपणामुळे अंमली पदार्थांच्या व्यसनामध्ये गुरफटली जाते. क्रिस्टोच्या सूचनेनुसार मॅडम व्हिलिफर्ट आपली सावत्र मुलगी व्हॅलेन्टिन हिला तिचे दागिने लुबाडण्यासाठी जहाल गुंगीचे औषध देते. त्याचा विपरीत परिणाम होऊन व्हॅलेंटिन मेल्यासारखी बेशुद्ध पडते. त्याच वेळी गुंगीच्या प्रभावाखाली असलेली मॅडम व्हिलिफर्ट व्हॅलेन्टिनच्या आणखी तीन नातेवाईकांना जहाल विष देऊन ठार मारते. व्हॅलेंटिनचा प्रियकर

मॅक्झिमिलियन मॉरेल (मॉन्टेच्या मित्राचा मुलगा) मॉन्टेकडे मदत मागायला येतो. मॉन्टे व्हॅलेन्टिनला एका खोलीत सुरक्षित ठेवतो व मॅक्झिमिलियनला सर्व मदतीचे आश्वासन देतो. आपल्या पत्नीचा बदफैलीपणा व मुलीचा मृत्यू डोळयांदेखत पाहून व्हिलिफर्ट चिडतो; संतापाने बेभान होऊन तो भ्रमिष्ट होतो. बेइमानी केल्याबद्दल तो पत्नीने केलेल्या खुनाचे गुन्हे जाहीर करण्याची धमकी देतो. मॅडॅम व्हिलिफर्ट त्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांच्याच एकुलत्या एक मुलाला विष देते व स्वतःही विष पिऊन आत्महत्त्या करते. त्याच वेळी क्रिस्टो त्याला आपली खरी ओळख देतो. आपल्या संसाराची ही वाताहात पाहून व्हिलिफर्ट ठार वेडा होतो.

आपल्या चारी शत्रूंचा सूड घेतल्यानंतर क्रिस्टो मृतवत बेशुद्धावस्थेत असलेल्या व्हॅलेन्टिनला शुद्धीवर आणतो. मॅक्झिमिलियन व व्हॅलेन्टिन या दोघांना आपली सारी संपत्ती देऊन मॉन्टे क्रिस्टो बेटावर पाठवतो व स्वतः हैदीला बरोबर घेऊन पुन्हा कधीही परत न येण्याच्या इराद्याने ग्रीसकडे रवाना होतो.

Melodrama असलेली ही कादंबरी वास्तवापासून खूप दूर आहे. पण २०० वर्षांपूर्वी केवळ करमणूकप्रधान व पुढे काय (suspense) या उत्सुकतेवर आधारलेल्या कादंबऱ्यांचे स्वरूप बहुतांशी असेच होते.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 25881194
Email: joshi.bindumadhav@gmail.com